# उत्तर बाल्यावस्थेतील विकास

## *(Developments in Late Childhood)*


## डॉ. माया खांदाट

गृहविज्ञान विभाग

(सौ. के. एस. के. कॉलेज बीड)

## उत्तरबाल्यावस्थेतील कारक विकास ( ६ ते १२ वर्ष) :-

पुर्वबाल्यायवस्थेच्या शेवटी शेवटी अनेक कौशल्य विकसित झालेली असतात, म्हणजेच अनेक प्रकारच्या पायाभूत क्रिया निश्चितपणे आत्मसात झालेल्या असतात. त्या आधारावर पुढील क्रिया शिकणे व त्यात निपुणता मिळवणे यासाठी बालकाचे प्रयत्न चालू असतात. सहा वर्षाच्या बालकाचा कारक विकास जलद गतीने होतो. या सुमारास मुलांना मार्गदर्शनाची व संबीची आवश्यकता असते. तसेच चांगले प्रशिक्षण मिळाल्यास मुले अधिक प्रगती करतात.

## शारिरीक विकास :-

- शरीराचा गोंडसपणा कमी होऊन शरीर काटकुळे दिसते.
- स्नायुचा विकास झपाटयाने होतो व हातापायाची लांबी वाढते.
- या अवस्थेत कौशल्य संपादनाचे वय म्हणतात.
- दुधाचे दात पडून कायमचे दात येतात सुळे दात येताना मुल शारिरीकदृष्टया अस्वस्थ बनते.
- दरवर्षी वजन ३ - ५ पौंड तर उंची २ इंचाची वाढते.
- हृदयाचा विकास झपाटयाने होतो.
- छाती रुंदावते व सपाट होते मान लांबते तर खांदे खाली उतरतात.
- रॉस यांच्या मते मेंदूची वाढ ८५ % इतकी होते.
- विविध संख्या शरीरात कार्यक्षत होतात.
- डोळयांचा विकास पूर्ण झालेला असून आकार प्रौढ व्यक्ती प्रमाणे झालेला दिसून येतो.
- मुले धावतांना, खेळतांना, ओरडताना, झाडावर चढताना दिसतात.
- या काळास वाढ रोखण्याचा काळ दृढीकरणाचा काळ म्हणतात.

## कारक विकास :-

- या वयातील मुले फार चंचल व धडपडी असतात.
- आरोग्य या वेळी चांगले असते.
- कारक शक्तीचा विकास झाल्यामुळे ती विविध कृती मध्ये रममाण होतात.
- धावणे, उडया मारणे, ओरडणे, खेळणे, झाडावर चढणे, लोंबकाळणे अशा कृतीत रममाण होतात.
- चाकू, कात्री याचा वापर करतात.
- लिहिणे, वाचणे, लंगडी घालणे, नृत्य करणे इत्यादी क्रिया करतात.
- सायकल चालवणे, पोहणे यासारखी कौशल्य प्रधान कृती करतात.
- हृदय व फुफ्फात्साची वाढ पूर्ण झालेली नसते म्हणून या वयातत त्यांना १० ते १८ तास
- झोप आवश्यक असते.
- स्नायुंवर ताबा आल्यामुळे चित्र काढणे, भरतकाम करणे, उदा. श्वसन, पचनसंस्था, विनकाम करणे, रंग भरणे इत्यादी कामे सफाईदारपणे करतात.

# विकासावर परिणाम करणारे घटक

# (Factors Effecting Growth and Development)

१

**सर्वसामान्य घटक**

A. अनुवंश
B. अंतःस्त्राव ग्रंथी
C. शरीर रचना
D. अन्न
E. व्यायाम
F. कार्यक्षमता
G. लैंगिक भिन्नता
H. वय
I. राष्ट्रीयत्व
J. वंश

२

**परिस्थितीजन्य घटक**

A. कुटूंब
B. शाळा
C. समाज व संस्कृती
D. समवयस्क मित्र
E. भौगोलिक परिस्थिती
F. प्रसार माध्यमे

३

**मानसशास्त्रीय घटक**

A. बुध्दी
B. भावना

## उत्तरबाल्यावस्थेतील भावनिक विकास (६ ते १२)

- ✓ सहाव्या वर्षापासून मुलांची समज वेगाने वाढते. एकाच वेळी अनेक गोष्टीचे आकलन त्यांना होते. भिती, लाजाळूपणा, आक्रमकता, भांडखोरपणा, अनुया, मत्सर, राग, प्रेम, मुक्या प्राण्यांच्या बाबत क्रुरपणा अतिशय रागावणे अशी भावनिकता दिसते.
- ✓ अनुभवाच्या आधारावर काही नवीन भावनाचा वेळेस निर्माण होतात. पूर्वी आढळणाऱ्या भावना नाहिश्या होतात. तर काही भावनाचे स्वरुप बदलते. मुलांचे क्षेत्र क्लिष्ट होत जाते. या अवस्थेतील बालकांना बऱ्याच समस्यांना सामोरे जावे लागते त्यातत यश न मिळाल्यास राग व चिड निर्माण होते.
- ✓ भावनांच्या अविष्काराच्या स्वरुपात फरक पडतो. मुले व मुली यांच्यामध्ये काही बाबतीत फरक आढळतो. मुलीमध्ये स्नेह, काळजी, भीती इत्यादी प्रमाणे अधिक असते तर क्रोध, जिज्ञासा, काळजी याचे प्रमाण मुलांमध्ये अधिक असते.

- **उत्तरबाल्यावस्थेतील भावना :-**
- **जिज्ञासा :-** शालेय वातावरणामध्ये काही प्रमाणात बालकाची जिज्ञासापूर्ती होते असली तरी बऱ्याच गोष्टीबाबत बालके असुन अज्ञाभिज्ञ असतात, त्या जाणुन घेण्याची इच्छा त्याच्यामध्ये आजुबाजूच्या अनेक घटनाबददलचे वैज्ञानिक बाबीबददल कुतूहल जागृत असते. उदा. फोनमधून दुरच्या व्यक्तीचा आवाज कसा येतो, घडयाळ कसे चालते, भुकंप होणे, पूर येणे, वीज कोसळणे हे सर्व कसे घडते माहिती करून घ्यावे असे त्यांना वाटते.
- **प्रेम :-** कुटूंबातील व्यक्तीबददल बालकांच्या मनात असणारा प्रेमभाव काही निकषावर आधारित असतो. जसे - १) ज्या व्यक्तीवर तो अवलंबुन असतो. २) ज्याच्या सहवासात तो अधिक वेळ घालवितो. ३) त्याचे लाड जो करतो, खेळामध्ये सहभागी होतो. ४) त्याच्या गरजा पूर्ण करतो इत्यादी.
- **आनंद हर्ष :-** पूर्वबाल्यावस्थेतील बालकाप्रमाणेच उत्तरबाल्यावस्थेतील बालके हर्ष किंवा आनंदाचा अनुभव घेतात. एखादया स्पर्धात्मक कृतीमध्ये यश मिळाल्यास आनंद वाटतो.

- **लाजाळूपणा (Shyness) :-** नव्या व्यक्ती किंवा अनोळखी व्यक्तीच्या समोर मुले लाजतात, मुलीमध्ये याचे प्रमाण अधिक असते, कुणा नवीन व्यक्तीसमोर बालकास गाणे म्हणायला, कविता म्हणायला, नाच करायला सांगीतले तर ते संकोच करतो व त्यामुळे ते आपली कला इतरांसमोर सादर करण्यात त्यांना अडचण वाटते.

- **भिती :-** उत्तरबाल्यावस्थेतील मुलांना शिक्षक किंवा पालक शिक्षा करतील याची भिती वाटते, परिक्षेची भिती, परिक्षेच्या निकालाची भिती वाटते, विशिष्ट व्यक्तीबददलची त्याला भिती वाटते.

- **राग :-** या अवस्थेतील बालकास राग येण्याची कारणे पुढील प्रमाणे बालकाच्या एखादया अपेक्षित कामात कुणी अडथळा आणला तर :- मुलांच्या अपेक्षा पूर्ण न करणे, सारख्या त्याच्या चुका काढल्या तर, त्याला चिडवले तर, उपदेश केला तर असे कर, हे करु नको, ते करू नको, इतरांशी तुलना केली तर काही वेळेस ही मुले स्वतःच्या क्षमतेपेक्षा जास्त अपेक्षा पूर्ण करण्याचे ध्येय ठेवून एखादे काम हाती घेतात. परंतु जर त्यामध्ये अपयश आले तर त्यांना स्वतःचा व परिस्थीतीचा राग येतो.

- **चिंता :-** या वयोगटातील मुलांना चिंता वाटते, भिती व दु:ख या दोन्हीचे मिश्रण यामध्ये असते, भविष्यातील घटनेबददल तो वर्तमानकाळात चिंता करतो. जसे मी गृहपाठ केला नाही तर शिक्षक उदया मला शिक्षा करतील ? रागावतील की वर्गातून बाहेर काढतील.

- **शोक (Grief) :-** शोक ही भावना असुखद भावनापैककी एक महत्वाची भावना मानली जाते. वाईट वाटणे किंवा दु:ख होणे याची तीव्रता वाढली म्हणजे त्याचे परिवर्तन शोकक या भावनेत होते. प्रिय व्यक्तीच्या दुरावल्याने होणारे अतीव दु:ख म्हणजे शोक असुन एक मानसिक आघात मानलं जातो (Psychic Trauma).

## सामाजिक विकास (Social Development) :-

मनुष्य हा एक सामाजिक प्राणी मानला जातो. नवजात अवस्थेपासून त्याला इतरांच्या सहवासाची गरज असते, अशी गरज असणे ही एक जन्मजात प्रवृत्ती आहे.

- **व्याख्या :- "सामाजिक संबंधातील परिपक्वता म्हणजे सामाजिक विकास होय" - एलीझाबेथ हरलॉक,**

वरील व्याख्येमधून असे दिसते की सामाजिक घटकांशी व्यक्तीचे संबंध जेव्हा दृढ होत जातात तेव्हा त्याचा सामाजिक विकास होत असतो.

## उत्तरबाल्यावस्थेतील बोधात्मक विकास :-

उत्तरबाल्यावस्थेत बालकाच्या आकलन क्षमतेचा विकास जलद गतीने होतो. औपचारिक शिक्षण घेत असतांना विविध विषयांच्या ज्ञानामधून आकलन वाढत जाते. यापूर्वीच्या संकल्पना चुकीच्या ठरतात. संकल्पनाचे अर्थ व कक्षा बदलत जातात, अधिक व्यापक होतात. भाषाविकास व बौध्दिक विकास चांगला झालेला असल्याने आकलन करून घेणे बालकास सुलभ होते. अंतराची संकल्पना एककामध्ये स्पष्ट होते. गणितीच संकल्पना दृढ होतात. नाणी व धन याबाबत आकलन वाढते सामाजिक भेदभाव लक्षात येऊ लागतात.

बौध्दिक विकास झालेला असल्याने वेगळी परिस्थिती आल्यास त्यातुन मार्ग कसा काढावा याबाबत मुले विचार करु लागतात व विशिष्ट परिस्थीतीत समायोजन कसे करावे याबाबत आकलन होते.

# धन्यवाद !!!